स्नेहबंध

गणेशोत्सव विशेषांक

सप्टेंबर २०२२



“आपले मंडळ”

Maharashtra Mandal of Detroit

महाराष्ट्र मंडळ डेट्रॉईट

एकमेका सहाय्य करु, अवघे धरु सुपंथ

The N. Rachmale Foundation

Prosperity Through Service

Avinash and Hema Rachmale

SKY Group Inc.

Sky Group Grand, LLC.
Real Estate Group

Lakeshore Healthcare Group, Inc.
Nursing Home & Managed Care

Lakeshore Global
Infrastructure Contractors

www.therachmalefoundation.org | www.Lgccorp.com

स्नेहबंध

अनुक्रमणिका

अनु.क्र.	लेख / कविता - नाव	लेखक / कवी	पृष्ठ क्र.
१	अध्यक्षीय	अध्यक्ष : मनोज पाटील	४
२	ओझे पैठणीचे	ज्योत्स्ना दिवाडकर	५
३	परिक्रमा	मृणालिनी देशपांडे	६
४	राजकन्या	डॉ. वीणा शहा	८
५	पण अघोरीपणाचा हट्ट का? – कविता	आशुतोष काळे	११
६	सवयीचा दास आहे.... कविता	संजय मेहेंदळे	१३
७	पाण्यावर तरंगणाऱ्या सुप (स्टॅन्ड अप पेडलबोर्ड, SUP) योगासनांची माहिती	प्रकाश कृष्णाजी वळसंगकर	१३
८	NEW YORK NEW YORK	सुषमा सुखटणकर	१६
९	आठवणीतील एक आगळावेगळा गणेशोत्सव	योगेश औंधकर	१९
१०	ट्रॉय मराठी शाळा	श्लोक वर्तक	२२
११	नाट्यसंपदा - एक संस्मरणीय अनुभव	सुशांत खोपकर	२४
१२	रसिका तुझ्याचसाठी	ज्योत्स्ना दिवाडकर	२७
१३	Journey to Canadian Rockies	अंजली वळे	२९
१४	पुन्हा एकदा.... कविता	संजय मेहेंदळे	३१
१५	फुलपाखरू - कविता	संगीता मोघे	३१
१६	कॅन्टन मराठी शाळा	रेवा जोगदेव	३३
१७	वसुधैव कुटुम्बकम	बाळकृष्ण पाडळकर	३४

संपादक :
ज्योत्स्ना दिवाडकर , संजय मेहेंदळे

मुखपृष्ठ, रचना व मांडणी :
स्नेहा नाफड - विपट

लेखकांना, चित्रकारांना आणि वाचकांना संपूर्ण मतस्वातंत्र्य देण्यात आले आहे. लेखांतून व चित्रांतून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक किंवा आपण सहमत असूच असे नाही, तेंव्हा आपण हा अंक केवळ "मनोरंजनासाठी" आहे अशी अपेक्षा ठेवून वाचावा, ही विनंती!

स्नेहबंध

अध्यक्षीय
नमस्कार मंडळी,

मराठी मंडळात सहभागी होण्याची प्रत्येकाची कारणं वेगळी असतात. अगदी सभासद झालो की कार्यक्रम स्वस्त पडतात या हिशेबी विचारापासून ते अमेरिकेत असलो तरी मराठीच्या प्रेमाने सुद्धा लोकं येतात. कार्यक्रमाला येणाऱ्या आपल्या माणसांना भेटण्यासाठी किंवा काही काही वेळेला अजून एक पाऊल पुढे टाकून जबाबदारीने कार्यकारिणी समितीमध्ये सुद्धा काहीजण येतात.

पाऊस, वादळ, बर्फवृष्टी, कडाक्याची थंडी, कामाच्या डेडलाईन्स, आप्तेष्टांना भेटण्यासाठी भारतात मारलेली चक्कर, मुलांना इकडून तिकडे ने-आण करणे, इथल्या जीवनाचे हे सर्व भाग सांभाळून कार्यकर्त्यांनी आणि सभासदांनी अनेक सांस्कृतिक सोहळे आनंदाने व उत्साहाने वर्षानुवर्षे साजरे केले आहेत. रात्री उशिरापर्यंत मंडळाच्या कार्यक्रमाची सांगड घालून, परत सकाळी आपली व्यावसायिक जबाबदारी निभावण्यासाठी तयार असणारे कित्येक कार्यकर्ते आपल्याकडे आहेत.

आता हेच बघा, आपण वर्षाच्या दुसऱ्या भागात येऊन पोहोचलोत आणि आपण याच कार्यकर्त्यांच्या जोरावर संक्रांत, “अश्रूंची झाली फुले” नाटक, बॅडमिंटन आणि कॅरम स्पर्धा, संगीत नाट्यसंपदा (पाडवा), मराठी शाळा वार्षिक समारंभ, प्रतापगडाचे मंत्रयुद्ध (रसिका तुझ्याचसाठी), उन्हाळी सहल, क्रिकेटचा सामना, आणि आज होऊ घातलेला गणेशोत्सव,ही एवढी मोठी यादी मागील काही महिन्यांत केलेल्या कार्यक्रमांची. याव्यतिरिक्त दर्जेदार मराठी चित्रपट दाखवणे, देवळातील काही पूजा-अर्चा, ज्येष्ठ नागरिकांचे उपक्रम यामध्ये मंडळाचा हातभार लागतोच. नुसत्या विचारानेच मी थक्क झालो आहे!

सगळ्याच कार्यक्रमांना यशस्वी करण्यासाठी अपार मेहनत लागते, पण आवर्जून विशेष उल्लेख करावा वाटतो तो आपल्या पाडव्याच्या ‘नाट्यसंपदा’ या संगीत नाटकाचा. संकल्पनेपासून ते सादरीकरणापर्यंत सगळेच अफलातून होते! २०२१च्या ऑगस्ट महिन्यापासून कोविडशी झुंजत अख्खी टीम झपाटल्यासारखी जुंपली होती. पन्नासहून अधिक कलाकार (मंचावरचे आणि मंचामागचे) ६-७ महिने शनिवार-रविवारीच नव्हे तर जमेल तसे आठवड्याभरातदेखील तालमी भरवत होते. एवढेच नव्हे तर नाटकासाठी भारतातूनही costumes खरेदी करणे इत्यादि कामं लीलया झाली. इतक्या छान अनुभवानंतर मला सांगण्यात आले की मंडळाचे असेच सहकार्य असेल तर अजून अशी projects करायला लोकं एका पायावर तयार होतील.

याशिवाय यावर्षी अजून एक नवा उपक्रम हाती घेतला. डेट्रॉईट व ॲन आर्बर, ही दोन्ही मराठी मंडळं एकत्र आली आणि मिळून क्रीडा स्पर्धा घेतल्या! त्यासाठी दोन्ही मंडळातल्या volunteers नी मिळून जे काम केले त्याला तोडच नाही.

एकूणच काय तर हा महाराष्ट्र जो इथे वसवलेला आहे, त्याचा सोहळा असाच सुरू ठेवण्यासाठी, ही मशाल तेवत ठेवण्यासाठी, तुम्ही मदतीचा हात पुढे केला आहेच. तो असाच पुढे राहू दे, अजून हात येऊन त्याला साथ देऊ देत. नवनव्या कल्पना अंमलात आणण्यासाठी नवे सभासद आणि नवी कुमके मिळू दे. गणपती बाप्पा मोरया!

आपला विश्वासू,
मनोज पाटील
अध्यक्ष , महाराष्ट्र मंडळ ऑफ डेट्रॉईट
फोन – (810)-571-1448 | ई-मेल – president@mmdet.org

स्नेहबंध

ओझे पैठणीचे

माझी पैठणी फिरत्या रंगाची आहे. उन्हाची तिरीप आली की जांभळी, गुलाबी, गुलबक्षी, आणि सोनेरी रंगांच्या छटा लहरींसारख्या साडीवर तरंगतात. करोनाच्या महामारीने काही संसार उद्ध्वस्त केले तर काही डाव मांडायच्या आधी उधळले. अशाच एका डावाची मी साक्षीदार होणार होते. जय्यत तयारी चालू होती. दक्षिणी लोकांचं लग्न होतं, तिथे पैठण्यांचा सुळसुळाट नसणार म्हणून ती नेणार होते. शेजारीच माझ्या आईच्या लग्नातली साडी - ५४ वर्षांपूर्वी घेतलेली - घडीत होती. ५४ आणि २५ वर्षांच्या साड्या माझ्या कपाटात अजूनही गुण्यागोविंदाने राहताहेत. लग्न पुढे ढकललंय्. मी उसासा टाकून माझ्या पैठणीची घडी बदलून ती पुन्हा कपाटात ठेवून दिली.

हल्ली असे उसासे टाकण्याचे अनेक क्षण येताहेत. मागच्या वळणावर ऐंशीच्या घरातले आईवडील तर पुढच्या टप्प्यावर मुलीचा भविष्यकाळ. कधीतरी वाटतं मी त्यांच्यातला दुवा आहे तर कधीतरी त्रिशंकूसारखी लोंबकाळते आहे असं वाटतं. आईचा बनारसी शालू मी नेसते पण पुढच्या पिढीला त्या पैठणीचं अप्रूप राहील का? पैठणीचं जाऊ दे, परदेशातले तिचं आयुष्य, ती साड्या तरी नेसेल का? तिच्यासाठी मी कशाला आटापिटा करून साड्या जपून ठेवते आहे? असं काही वाटायला लागलं की सारासार विचार बाजूला होतो.

मला आठवतं, माझे वडील गेल्यावर आईला मनस्ताप नको म्हणून मी त्यांचं एक कपाट आवरायला घेतलं. अनेक देश फिरूनही मनाने कोकणी असल्याने महत्वाच्या गोष्टी सुतळीच्या दोरीने बांधून ठेवलेल्या होत्या. अशाच एका गठ्ठ्यात माझ्या आजोबांनी जपून ठेवलेले कागद मिळाले (हा वारसा माझ्याकडे आला आहे). वीजेची बिलं, सोनं घेतल्याच्या (आणि मोडीत काढल्याच्या) पावत्या, घटनांच्या नोंदी, वर्तमानपत्राची कात्रणं, रागाने खरडून पाठवलेलं पोस्टकार्ड, सविस्तर वर्णनाची पातळ कागदांवरची पत्र. काळ्या आणि निळ्या शाईची दौतीसकटची फाऊंटनपेनं. त्या पेनाने अनेक महत्त्वाच्या कागदांवर सही केलेली असते. प्रगतिपुस्तकं, त्यांना आलेली पत्रं, त्यातच चांदीचं कानकोरण घुसवलेलं असतं. पूर्वी या सरमिसळीचा मला राग यायचा, कशाला हे जुनंपुराणं ठेवता, त्यापेक्षा माझी खेळणी, कपडे काहीतरी मावेल ना! असं म्हणायचे. पण आता मला त्या फुटकळ गोष्टी जिवापाड जपाव्याशा वाटतात. मी त्या तशाच उचलून माझ्या सामानात ठेवते. वाडवडिलांचा इतिहास माझं भविष्य घडवतो. अजून काही दशकांनी या जंबाडासकट माझ्या संसाराची उत्तरपूजा करायची जबाबदारी माझ्या मुलीची! माझ्या एका मैत्रिणीचा हाच व्यवसाय आहे. घर सोडताना किंवा आईवडिलांच्या पश्चात घरातील स्थावरजंगमाची वर्गवारी करायची: ठेवून दे, देऊन टाक आणि टाकून दे. हे भावनाविवश झालेल्या मुलांना जमणार नाही, अशा वेळी त्रयस्थच मदत करू शकतो.

आठवणींचं गाठोडं, कमाईचं डबोलं आणि महत्वाकांक्षांचं ओझं पुढच्या पिढीकडे सुपूर्द करायचं असतंच. पण त्याचबरोबर अट्टाहासाने जमवलेली भांडीकुंडी, पुस्तकं, औरंगाबादची शाल, बनारसहून मागवलेला 'शालू', ताटं, लंगडी, पितळी, मोदकपात्र हौसेने गोळा केलेल्या वस्तू, गुलाबी कागदावर लिहिलेली पत्रं हे सगळं असतंच की. कधीतरी वाटतं हे जपून ठेवून माझ्या सामान्य आयुष्याला मी नको इतकं महत्त्व देते आहे की काय?

माझी अशी फुटकळ मालमत्ता पाहिली की बरेच जण म्हणतात; कशाला ठेवतेस ते सगळं? देऊन टाक कोणाला तरी, नाहीतर सरळ कचऱ्यात जाऊ दे. मला एकीकडे त्यांच्या विचारी दृष्टीचं कौतुक वाटतं तर दुसरीकडे वाईटही वाटतं. कदाचित हा वेडा हळवेपणा यायला काहीतरी गमवावं लागत असेल. किंवा अजून दहाबारा वर्षांनी पूर्वायुष्यातील (आणि पूर्वजायुष्यातील!!) गोष्टींकडे पाठ फिरवणं सोपं जाईल. पण आत्ता मात्र दुपार टळली असली तरी मावळतीची किरणं अजून दिसत नाहीयेत. मुलांसाठी आपण काय काय ठेवतो! आणि काय ठेवावं? घर ठेवावं की फक्त विटा आणि त्यांच्यातून घर निर्माण करायची क्षमता? आपल्या पाठीवरून उडत न्यायचं की त्यांच्या पंखाना बळ द्यायचं?

घर ठेवतो ते आपल्या कृतीचं प्रतीक तर पुस्तकं, आजीआजोबांपासून चालत आलेल्या परंपरा त्यांच्या ओटीत घालतो हे संस्कृतीचं प्रतीक. ओटीत थोडा हळवेपणाही घालावा आणि पैठणीही. शांताबाई शेळके त्यांच्या कवितेत म्हणतात

धूर कापूर उदबत्यांतून
जळत गेले किती श्रावण
पैठणीने जपले
एक तन.. एक मन..

पोचे गेलेल्या पातेल्यांतून आणि विरत चाललेल्या पैठणीतच आपल्या अस्तित्वाचे बीज सापडेल...

- ज्योत्स्ना दिवाडकर

परिक्रमा

हवेत परत एकदा सुखद गारवा जाणवायला लागला. बर्फाच्या आणि कडाक्याच्या थंडीच्या कचाट्यातून बाहेर पडलेल्या झाडांना नाजूक पालवी फुटताना दिसू लागली. ऋतू बदलायची जाणीव मनात रुजेपर्यन्त बाहेर निसर्ग हिरव्या रंगांच्या अनेक छटांनी बहरून गेला. नेहमीप्रमाणे शेजारच्या निसर्गरम्य बागेत एक लांब चक्कर मारायला गेले. तिथल्या उंच झाडांमधून पाऊलवाट शोधत फिरताना स्वतःशीच परत एकदा नव्याने भेटले. आणि निसर्गाप्रमाणेच आयुष्यातले ऋतू पण बदलायला लागले आहेत ह्याची जाणीव झाली.

"अगं, जरा एका ठिकाणी बसून बोल," आईची दर वेळी फोनवर तक्रार असायची. आता आठवतंय.
मी जाम दुर्लक्ष करायची. फोन नियमित असायचा. पण न चुकता फोनवर पार्श्वसंगीत चालू असायचं. कुकरच्या शिट्ट्या, भांडयाचे आवाज, भाजी चिरताना होणारी सुरीची करकर इत्यादी इत्यादी. आईची परत नेहमीचीच कॉमेंट आणि माझं ऐकून न ऐकल्यासारखं करणं. माझं कसं काय चाललंय यांत अधिक रस असल्यामुळे, आईचं आवडत नसलेल्या गोष्टींकडे कानाडोळा करणं. सगळं नेहमीचंच.



आता मुलं मोठी झाली. इच्छित स्थळी पोहोचली. आपापल्या विश्वात रमली. रोल्स बदलले. त्यांच्याशी वार्तालाप करताना, आईच्या "त्या" म्हणण्यामागची भावना मी आज अनुभवतेय.

निसर्गाचं चक्र चालू असतं नाही? इवल्याशा रोपाचं रुजणं, वाढणं, त्यावर कळी उमलण्याचे स्वप्न पाहणं. त्या कळीतून फळ येऊन, परत त्यातलं बीज रुजणं. पुन्हा एकदा त्याच परिचित चक्राची सुरुवात. त्या एकाच बीजाने फुलं, फळांनी बहरण्याची स्वप्न पहिली असतील? ती स्वप्नपूर्ती होण्यासाठी किती वादळांना सामना करत खडतर प्रवास केला असेल. प्रत्येक ऋतूला समर्थपणे झेलत, अपयशाची पर्वा न करता, फळाची अपेक्षा न ठेवता त्या बीजाचा प्रवास त्याचा त्यालाच करावा लागतो. फुलं बहरण्याच्या ऋतूची वाट पाहत मातीत मुळं घट्ट रोवून, उन्हातान्हात, वादळवाऱ्यात त्याची जणू तपश्चर्याच चालू असते. आयुष्याचं पण असंच असतं नाही? आपणही किती काळ निद्रिस्त, सुस्तावलेल्या अवस्थेत असतो. अचानक आयुष्यात ऋतू बदल जाणवतो. प्रत्येक बदलाबरोबर आयुष्याचा हेतू अधिक स्पष्ट दिसतो. आपण परत बदलतो. आपल्या अस्तित्वाचा हेतू साध्य करण्यासाठी आपलीही परिक्रमा चालूच राहते!!

- मृणालिनी देशपांडे

CENTRAL HOME HEALTH CARE, INC.

Quality Home Health Care Since, January 1985
JCAHO Accreditation Since 1991

Do You Have……..

1. Joint, Neck, or Back Pain or Joint Stiffness?
2. Poor Circulation or have a Wound that is not healing?
3. Diabetes, Heart, and/or Respiratory Problems?
4. A Cardiac diagnosis that affects your quality of life?
5. A previous Stroke, Accident or Fracture(s)?
6. Difficulty with walking or a history of falls?
7. Or will have a Hip/Knee/Shoulder Replacement?
8. Problems with frequent Hospitalizations?

If so, then you may be eligible for home care services from Central Home Health Care.

WHO PAYS?

Your Insurance will pay **IN FULL** if you have Medicare, Medicaid, BCBS, Auto, or Private Insurance.

WHAT YOU NEED TO DO?

Call our number below or ask your physician/social worker to call us to make a referral.

WHAT DO WE OFFER?

Nursing, Physical Therapy, Occupational Therapy, Speech Therapy, Medical Social Work, Home Health Aide Services, Registered Dietician Services.

WE COVER THE METRO-DETROIT (TRI-COUNTY) AREA

Ph: (800) 698-5410 – Fax (248) 569-5412

Owned and Operated by the Walvekar Family
20245 W. 12 Mile Road, Ste. 100, Southfield, MI 48076.
www.centralhomecare.com

स्नेहबंध

राजकन्या

मी अगदी लहान असेन तेव्हा. धाकटी आत्या चार दिवसांच्या माहेरपणासाठी आली होती. तिची, माझी खास दोस्ती. गप्पागोष्टी, पत्ते, सिनेमा-नाटके यामध्ये दिवस भराभरा चालले होते. एक दिवस स्वयंपाकघरातून छान-छान वास यायला लागले. खमंग चकल्या, चिवडा, गोडाचा शिरा.... दिवाळी नसतांना हे पदार्थ आमच्या घरात तयार होणे हे अप्रूपच होते. मी नाकाने माग काढत स्वयंपाकघरात पोचले. आई, आजी, आत्या यांचे हात व तोंडे दोन्ही जोरात सुरु होती.

"एव्हढी मोठी संस्थानची राजकन्या, पण कणभर देखील ताठा नाही बरं का!" आत्या.

"वन्स, ती तुमच्या बरोबरच मधल्या सुट्टीत डबा खात होती?" आई.

"हो ना! संस्थानिकांच्या मुलींसाठी एक खास खोली होती शाळेत. पण ही यशू मात्र आमच्याच बरोबर झाडाखाली बसणार डबा खायला. एकमेकींच्या डब्यांची अदलाबदल सुध्दा करत होतो आम्ही.... "

"त्यांनाही गणवेश घालायला लागायचा का ग?" आजी.

"लागायचा तर! कपडे चार-चौघींसारखेच, पण शाळा सुटल्यानंतर मात्र दोन-दोन घोड्यांच्या बग्ग्यांमधून जायच्या सगळ्या राजकन्या आणि सरदार-जहागीरदारांच्या लेकी. एक-दोघींच्यासाठी तर मोठ्याच्या मोठ्या पॅकार्ड, इंपाला, वगैरे गाड्या वाट बघत असायच्या."

आता मात्र मला उत्सुकता आवरेना. (उगीच नव्हतं आजीनं माझं नाव "चौकस भवानी"ठेवलं)

"कोण येणार आहे आपल्याकडे? कुठली राजकन्या?"

"पुण्याजवळ ते संस्थान आहे ना, त्यांची ती राजकन्या"...

कुठलं संस्थान, नाव काय, केव्हा येणार, वगैरे शंभर प्रश्न माझ्या डोक्यामधून वळवळत बाहेर पडणारच होते, तेवढ्यात आजीने फर्मान काढले

"ही एक चकली घे आणि बाहेर खेळायला जा बघू! आम्हाला जरा कामं करू दे. ती आल्यावर काय लपून राहणार ? भेटेलच तुला."

मी चकली तोंडात कोंबत बाहेर कट्ट्यावर वाट बघत ठाण मांडून बसले.

"आज काय तुमच्याकडे पाहुणे येणारेत म्हणे?'

शेजारची माझी मैत्रीण कुमी ताबडतोब हेरगिरी करायला आली. उत्तेजनार्थ तिने एक आवळा माझ्या हातावर ठेवला.

"अगं, साक्षात राजकन्या येणारेय आमच्याकडे!

"अय्या, खरंच? कुठल्या राज्याची? नाव काय?" कुमी.

"यशू कुमारी किंवा यशू देवी असं काहीतरी आहे म्हणे. राज्य- बिज्य मला माहीत नै बै ..."

"ए, घोड्यांच्या रथामधून येईल का ग ती ?" कुमी.

"मला वाटतं चार पांढऱ्या-शुभ्र घोड्यांच्या, मोठ्या थोरल्या रथामधून येईल ती. आपल्या दास- दासी बरोबर घेऊन." मी आत्मविश्वासाने कुमीला सांगितलं.

"आणि भरजरी शालू, रेशमी शेला...."

"डोक्यावर रत्नजडित मुकुट... की हिरेजडित ग?"

"हिऱ्याचे दागिने असतील की सोन्याचे ग?"

"इथे दरबार वगैरे नाहीये ना... रोजचे मोत्याचेच दागिने घालून येईल बहुतेक...."

"बरोबर भालदार- चोपदार असतील नै?"

"लाल पायघड्या घालणार आहात का ग?"

स्नेहबंध

मी आणि कुमी स्वप्नरंजनात दंग होऊन गेलो. किती वेळ गेला, कोणास ठाऊक!

वाड्याच्या दिंडीदरवाज्यासमोर एक रिक्षा येऊन उभी राहिली. साधीशी सुती साडी नेसलेली एक मध्यमवयीन बाई तिच्यातून उतरली. भिरभिरत्या चौकस नजरेने इकडेतिकडे बघून आम्हा दोघींना ती काहीतरी विचारणार, इतक्यात घरातून आत्याची आनंदित हाक ऐकू आली,

"यशू, ये ग.... किती वर्षांनी भेटतो आहोत आपण!"

मी आणि कुमी 'आ' वासून एकमेकींकडे बघतच राहिलो. आत्या आणि मैत्रीण हातात हात घालून आमच्या घराकडे गेल्या. अर्थात माझं अन कुमीचं शेपूट बरोबर घेऊनच. मधल्या खोलीमधून आम्ही दोघी बैठकीच्या खोलीत काय काय चाललंय यावर लक्ष ठेऊन होतो व जीवाचे कान करून ऐकत होतो.

"कशी आहेस यशोधरा? मजेत आहेस ना? लेकरं मोठी झाली असतील ना तुझी?" आजीने विचारले.

"हो मावशी, मिनी सहा वर्षाची आणि डब्या आठ!"

आम्ही दोघी दारात उभ्या राहून खुदु खुद्द हसायला लागलो. राजकन्येच्या, राजकन्येचं नाव मिनी, आणि राजपुत्राचे नाव डब्या! धमालच होती.

"अगं पोरीनो, मिनी म्हणजे मृणालिनी देवी आणि डब्या म्हणजे आदित्य प्रताप सिंह. कितीतरी दिवस दोघांना आपापली नावच नीट सांगता येत नव्हती..." राजकन्या, (की आता महाराणी?) यशोधरादेवी म्हणाल्या.

"हल्ली अजून काय काय करतेस यशू? किती सुंदर कविता लिहीत होतीस, आणि छान चित्रं काढत होतीस ग तू!"

" कविता? आणि पेंटिंग?" राजकन्येच्या डोळ्यात टचकन पाणी आलं.

" अगं, वाड्यातलं येणं-जाणं, रितीरिवाज, कुळधर्म- कुळाचार, या सगळ्यात पिट्ट्या पडतो ग माझा! एक मिनिट शांतपणाने पुस्तक वाचायलासुद्धा वेळ मिळत नाही... कुठल्या कविता, कुठलं पेंटिंग? तू एवढी जिवाभावाची बालमैत्रीण गावात आलीस, तर दोन तास तुझ्याघरी यायला सुद्धा मला चार जणांच्या परवानग्या काढायला लागल्या. सासूबाई तर म्हणाल्या, जायलाच हवं का? रिक्षाने पटकन जा अन तासाभरात परत ये. अगं घरी चार-चार गाड्या अन तीन-चार ड्रायव्हर आहेत. यांची संस्थाने खालसा झाली तरी विचार काही बदलत नाहीत. आणखी काय सांगू तुला?'

आता मात्र राजकन्या डोळ्याला रुमाल लावून हुंदके देऊन रडायला लागली, अन तिच्या पाठीवर हात ठेऊन आत्याही मुसमुसायला लागली. आईने खुणेनेच मला अन कुमीला बाहेर पिटाळले.

आम्ही दोघी पुन्हा सुन्न होऊन कट्ट्यावर बसून राहिलो.

थोड्या वेळाने आई, आजीचा निरोप घेऊन राजकन्या ओटीतला नारळ, तांदूळ सांभाळत बाहेर आली. तिच्या केसात आत्याने आठवणीने आणलेला गजरा माळलेला होता.

"मने, यशुसाठी एखादी पिशवी आण बघू आतून, ओटी ठेवायला.... " आत्या म्हणाली.

मी पळत जाऊन पिशवी आणली. आजीने तिच्यात थोड्या चकल्या अन चिवडा बांधून दिला होता. हातातून पिशवी घेऊन राजकन्येने माझ्या केसांवरून हात फिरवला. "ही पण आपल्याच शाळेत शिकते ना लिलू?"

राजकन्येचे ओठ हासत होते, पण नाकडोळे अजूनही सुजलेले, लाल-लालच होते. तिला रिक्षा मिळवून देईपर्यंत आम्ही बाहेरच थांबलो.

उदासपणे हात हलवत राजकन्या रिक्षेमधून आपल्या महालाकडे निघून गेली.

- डॉ. वीणा शहा

Pillars of Strength and Character.

Premier Provider for Property and Casualty Insurance

HERITAGE® Insurance

(855) 536-2744

www.heritagepci.com

WITH BEST COMPLIMENTS OF HERITAGE INSURANCE HOLDINGS, INC. AND VIJAY S. WALVEKAR, ONE OF ITS FOUNDERS AND DIRECTORS.

स्नेहबंध

पण अघोरीपणाचा हट्ट का?...

तुम्ही उशीरापर्यंत वाचत बसणार
तुम्ही अमृतांजन चोपडणार
तुम्ही चार वेळा कूस बदलणार
पण, पण आम्ही मात्र घोरायचं नाही

तुम्ही खोकणार, तुम्ही शिंकणार
तुम्ही घसा साफ करणार
रात्री औषधाला मला उठवणार
पण, पण आम्ही मात्र घोरायचं नाही

रात्रभर तुमचा पंखा चालणार
तुम्ही रात्री चार वेळा उठणार
पंख्यामुळे, आम्हालाही उठावे लागणार
पण, पण आम्ही मात्र घोरायचं नाही

अहो हा अ-घोरी पणाचा हट्ट सोडा
दुसऱ्याला घोर लावण्यापेक्षा,
स्वतः घोरलेलं बरं
तुम्हीही घोरा, आम्हालाही घोरुद्या

तुम्हीही घोरा आम्हालाही घोरुद्या
तुमचा सूर आमच्या सुरात मिसळू द्या
झोपेततरी मोकळा श्वास घेऊद्या
घोरणे हाही एक जन्मसिध्द हक्क होऊद्या

बरं तुम्हाला घोरतां येत नसेल तर
तर तुम्ही कानाचे मशीन काढून ठेवा
तुम्ही आतातरी गाढ झोपायला शिका
आणि, आणि आम्हालाही शांत घोरुद्या
आम्हालाही शांत घोरुद्या

- (एक घोर कवी) आशुतोष काळे

सवयीचा दास आहे....

व्यक्त व्हावयाचे निरंतर, हाच मनाला
ध्यास आहे
काय खरडायचे नित्यनूतन, हाच
डोक्याला त्रास आहे.

खरडून चालवावी ज्ञानाने, आपणच
आपली भिंत
आभासी जगात चालण्याला, तेवढीच
एक बास आहे.

देवघेव करावी इमोजींची, अहो रुपम
अहो ध्वनी
सोशल मीडिया जगण्याचा, तोच एक
श्वास आहे .

प्रतिक्रियांचा पाऊस आहे, लाईक्सची
रास आहे
फुगलेल्या लोकसंग्रहाचा, नुसताच एक
भास आहे.

आंतरजालाच्या महाभारतात,
विस्तारलेल्या चक्रव्यूहात
नव्या वर्तुळाचा, संजय हाच व्यास आहे.

- संजय

With Best Compliments from

Sharayu and Pradeep Kokate

पाण्यावर तरंगणाऱ्या सुप (स्टॅन्ड अप पेडलबोर्ड, SUP) योगासनांची माहिती

गेली ४२ वर्षे माझ्या कुटुंबाचे वास्तव्य डेट्रॉईट ह्या शहरात आहे. मी Chrysler कंपनीच्या इंजिनियरिंग विभागातून ३० वर्षे काम करून निवृत्त झालो आहे.

आम्हां भावंडांचे लहानपण अहमदनगर येथे गेले. वडिलांनी लहानपणापासून दररोज बारा सूर्यनमस्कार घालण्याची शिस्त लावली आणि योगासनांचा आरंभ करून दिला. परंतु पुण्यामध्ये नोकरीनिमित्त कामाला लागल्यानंतर वजने उचलण्याचा व्यायाम करण्याची सवय माझा मोठा भाऊ मधुकर ह्यांच्यामुळे लागली. समर्थ व्यायाम मंदिरात मी आणि माझा मोठा भाऊ आठवड्यातून चार वेळा रोज एक तास वजने उचलत असू. त्यामुळे माझे शरीर खूप बळकट झाले परंतु माझी योगासने करण्याची सवय मात्र तात्पुरती थांबली.

Chrysler च्या इंजिनीरिंग सेंटर मध्ये अत्यंत आधुनिक व्यायामशाळा होती. त्या व्यायामशाळेत सर्व व्यायामप्रकारात योगासनाचे वर्गही दिले जात असत. त्यामुळे माझा योगाभ्यास परत चालू झाला. महर्षी पतंजली ह्यांनी सर्व जगाला योगाची एक मोठी देणगी दिली आहे. अमेरिकेत योगाभ्यास करण्याचा अर्थ 'योगासने करणे' असा झालेला आहे. योगासनाबरोबर थोडा प्राणायाम केला जातो. योगाची आठ अंगें फार थोड्या विद्यार्थ्यांना माहित असतात. पारंपरिक योगाशिवाय यिन योगा, गरम योगा, गरम पिलाटे, सुप योगा वगैरे योगाचे प्रकार अमेरिकेत केले जातात.

ह्या लेखात मी वाचकांना सुप योगा (स्टॅन्ड अप पेडलबोर्ड योगा) ह्याबद्दल माहिती देत आहे आणि माझे काही सुप योगाचे फोटो ह्या लेखाला जोडत आहे.

सुमारे सहा वर्षांपूर्वी माझ्या एका योगा शिक्षकाने सूप योगाबद्दल माहिती दिली. दोन योगा स्टुडिओ स्टोनी क्रीक पार्कच्या तळ्यात जून ते सप्टेंबर ह्या महिन्यात सुप योगाचे वर्ग देतात असे सांगितले. मी आधीच पारंपरिक योगा, यिन योगा, गरम योगा, गरम पिलाटे करत होतोच. त्यामुळे 'सुप योगा' करण्याचे आव्हान स्वीकारले.

सुप योगा हे पेडल बोर्डिंग आणि योगासने ह्याचे एकीकरण आहे. तुम्हाला योगासने करणे आणि पाण्याजवळ असणे आवडत असेल तर सुप योगा तुम्हाला खचितच आवडेल. तुमच्या शक्तीला आणि तोल सांभाळण्याला सुप योगा आव्हान देईल.

सुप योगाची प्रॅक्टिस पेडल बोर्डावर तळ्यामध्ये शांत पाण्यावर केली जाते. पेडल बोर्डाचा आकार साधारणपणे ८ फूट लांब X ३ फूट रुंद X ६ इंच जाड असतो. पेडल बोर्ड हा हार्ड बोर्ड किंवा हवेने भरलेला बोर्ड असतो. हवेने भरलेला बोर्ड अंगाला सुखकारक वाटतो आणि इतका बळकट असतो की तुम्ही त्यावर उभे राहून योगासने करू शकता. पेडल बोर्ड तळ्याच्या तळाला अँकर केला जातो. त्यामुळे पेडल बोर्ड फक्त अँकर भोवती फिरतो परंतु हवेमुळे दूर वाहून जात नाही आणि सर्व योगाचा वर्ग एकत्र राहतो. १० ते १२ विद्यार्थी ह्या योगाच्या वर्गात असतात. योगाचा वर्ग संपल्यावर तळाचा अँकर काढला जातो आणि तुम्हाला थोडा वेळ तळ्यात पेडल बोर्डिंग करायला संधी मिळते.

सुप योगा करण्याचे फायदे:

१) पाणी, आकाश, सूर्य, हवा आणि आजूबाजूची हिरवीगार झाडी अशा निसर्गरम्य वातावरणात योगासने करणे अप्रतिम वाटते.
२) सुप योगासने करताना आपण ज्या स्नायूंचा वापर करतो तो वापर जमिनीवरील योगासनात फारसा केला जात नाही. उदा. पोटांचे स्नायू सुप योगाने जास्त बळकट होतात.

३) 'सुप बोर्ड' हा पाण्यावर कायम हालत असल्यामुळे प्रत्येक आसन करण्यास जास्त धारणा (कॉन्सन्ट्रेशन) लागते.

४) तोल सांभाळणे आणि शरीराचे कोऑर्डिनेशन वाढण्यास मदत होते..

सुप योगा करताना खालील काळजी घ्यावी:

१) जर तुम्हाला पाण्याची भीती वाटत असेल तर सुप योगा तुमच्यासाठी नाही, कारण तोल जाऊन पाण्यात खूप वेळा पडायला होते. जर पाणी खूप उथळ असेल तर पाण्याच्या तळाला असलेल्या दगडांवर पडण्याचा संभव वाढतो. त्यामुळे थोड्या खोल पाण्यावर सुप योगा करणे चांगले.

२) वाऱ्यामुळे पाण्यावरील लाटा मोठ्या होतात व तोल सांभाळण्यास अवघड जाते.

३) आपल्या शरीराच्या क्षमतेची आपल्याला जाण असणे अत्यंत आवश्यक आहे. हळू हळू प्रगती करावी.

मी नियमितपणे जमिनीवर योगासनांची प्रॅक्टिस करत असल्यामुळे सुप योगासनांमध्ये मला एक वेगळा आनंद मिळतो . झोपून आणि बसून केलेली योगासने सुप बोर्डावर बरीचशी सोपी वाटतात. परंतु उभी राहून केलेली आसने मात्र थोडी अवघड वाटतात. त्यामुळे पाण्यात पडण्याची माझी तयारी असते. योगाच्या वर्गातील खूप विद्यार्थी सुरवातीला पाण्यात पडतात. मी स्वतः सुरवातीला 'वीरभद्रासन १' आणि 'वीरभद्रासन २' अशा प्रकारची उभी आसने करताना बरेच वेळा पाण्यात पडलो. शिर्षासन करताना तर खूपच वेळा पाण्यात पडलो. परंतु मी प्रयत्न करत राहिलो. आता मात्र माझा आत्मविश्वास बराच वाढला आहे आणि पाण्यात पडणे जवळ जवळ बंद झाले आहे. माझ्या स्नायूंना हलत्या बोर्डाची सवय झाली आहे. सुप योगाचे वर्ग पोहण्याच्या तलावावर देखील दिले जातात.

नमस्ते.

- प्रकाश कृष्णाजी वळसंगकर

DABHI BROTHERS GARMENTS

NEW ARRIVAL

DBGL FASHION
dabhibrothers.com
WhatsApp: 91-9825430890
USA and INDIA

LEHENGA SETS

SAREES

BRIDAL

GOWNS

SUITS

INDOWESTERN

Mfg. & Wholesaler of
Designer Chniyacholi, Sarara, etc.

DABHI BROTHERS GARMENT LLP

Dilip Dabhi
Nr. Karamsad Bus stand,
Opp. Bhagvati Bhajiya,
Karamsad (Anand-Guj.)
+91 98254 30890
dbgl@dabhibrothers.com
dabhibrothers.com

Manu. & Wholesaler of Designer
Chniyacholi, Sarara, Sarees etc.

DABHI BROTHERS GARMENT LLP

Sneha Patel
50900 Drakes Bay Drive,
Novi, MI 48374
+1248-470-6552

Made with PosterMyWall.com

NEW YORK NEW YORK

शाळा-कॉलेजात असताना इंग्लिश सिनेमे बघायची एक फॅशन होती, मग त्यातलं ९०% डोक्यावरून गेलं तरी चालेल पण त्यातल्या त्या टोलेजंग इमारती, प्रचंड आकाराचे स्वच्छ highways, लांबलचक सुंदर सुंदर मोटारी वगैरे पाहून असं वाटायचं कीं हा देश आपलं वैभव दाखवून बाकीच्या देशांना टुकटुक करतो आहे. सुदैवाने मला लग्नानंतर NY ला यायची संधी मिळाली आणि “जावे त्याच्या वंशा तेंव्हा कळे “ या म्हणीचा प्रत्यय आला.

लवकरच मला Hearst Magazines नावाच्या publication कंपनीत जॉब मिळाला. वेगवेगळ्या मासिकाच्या विक्रीचे statistics काढायचे. मला सर्वात आश्चर्याचा धक्का बसला तो विक्रीचे statistics पाहून! सर्वात जास्त विक्री astrology च्या मासिकांची आणि त्या नंतर शब्दकोड्यांची! भारतात लोक ज्योतिष्यावर खूप विश्वास ठेवतात हे माहीत होते पण अमेरिकेत सुद्धा?

माझ्याबरोबर दोन गुजराती बायका काम करीत होत्या. त्या एकसारख्या कुणीतरी ‘गुलाबबेन’चे नाव घेऊन तावातावाने गुजराथीमधून बोलत. माझी या गुलाबबेनला भेटायची उत्सुकता वाढत चालली. थोडी ओळख वाढल्यानंतर कळून चुकले की आमची Ms. Rose नावाची खडूस supervisor होती तिला ह्या गुलाबबेन म्हणत! मलासुद्धा ‘तिला गुलाबबेन म्हण’ अशी ताकीद देण्यात आली म्हणजे अमेरिकन लोकांना काही तिच्याबद्दल बोललेले कळणार नाही.

येथेच एक Annette नावाची बाई काम करीत होती. ती M. A. शिकलेली होती. एरवी गुपचूप आपले काम करण्यात गर्क असे पण एक दिवस ती अचानक आमच्यासमोर नाचायला लागली. तिच्या हातात पाण्याने भरलेला ग्लास होता. मी आश्चर्याने ‘आ’ वासून बघतच बसले तेव्हा शेजारची एलिझाबेथ मला म्हणाली " today must be a full moon day" तेव्हा कळलं की तिला दर पौर्णिमेला वेडाचं भरतं येतं. मी अशा गोष्टींवर कधीच विश्वास ठेवला नव्हता पण हा “आंखो देखा हाल” बघितल्यावर - तो पण अमेरिकेत- एका अमेरिकन बाईला दर पौर्णिमेला नाचताना पाहून विश्वास ठेवणं प्राप्त झालं!

सगळं सुरळीत चाललं होतं, घी देखा लेकिन अभितक बडगा नही देखा था. न्यूयॉर्क मध्ये राहण्याचे फायदे कळत होते पण तोटे काय आहेत हे अनुभवायला आता सुरुवात होत होती. एका संध्याकाळी फोन वाजला, “ अग मी अनुराधा बोलते आहे एअरपोर्टवरून . तुमची हरकत नसल्यास आम्ही दोन दिवस तुमच्याकडे राहू का?” मुंबई सोडल्यापासून कोणीतरी ओळखीचे भेटणार याचा मला खूप आनंद झाला. मी म्हटलं ये ना काही हरकत नाही. माझ्या नवऱ्याने पण त्यांना airport वरून pickup करायचे कबुल केलं ,पण त्याने कधी ह्या लोकांना बघितले पण नव्हते शेवटी तिने खूण सांगितली “ मी गुलाबी पंजाबी ड्रेस घातला आहे आणि केसांचा अंबाडा आहे" एव्हड्या खाणाखुणावरून माझा नवरा त्यांना घरी घेऊन आला. घरी आल्यानंतर त्यांनी खुलासा केला की आमचं एअर इंडिया च फ्री तिकीट असत त्यामुळे आम्हाला जागा रिकामी असेल तरच flight घेता येते. त्यामुळे आम्ही केंव्हा येणार ते सांगू शकत नाहीं त्यानंतर असे कितीतरी एअर इंडिया चे “free loaders “ आमच्याकडे येऊं लागले. संध्याकाळी फोन वाजला की धडकी भरत असे. शिवाय त्यावेळेस caller id नव्हती आणि येणारे लोक public फोन वापरून कॉल करायचे. ह्यातले बरेच लोकं मी कधीं बघितले पण नव्हते ते माझ्या आईवडिलांची ओळख सांगून यायचे. शेवटी मी घरी खरमरीत पत्र लिहिले आणि सांगितले की माझा फोन नंबर कुणालाही देऊ नका, तर मला आईचे उत्तर आले “ हे बघ .. आमच्याकडे कोणी येऊन तुझा नंबर मागितला तर आम्हाला मुलीचा नंबर माहित नाहीं एवढं खोटं आम्ही बोलू शकत नाहीं तेंव्हा तूच त्यांना सांग की तुमची सोय माझ्याकडे होणार नाही. “ त्यामुळे हा प्रकार चालूच राहिला.

माझ्या वडिलांचे एक मित्र आमच्याकडे वरचेवर येत. त्याचा भाऊ एअर इंडिया मध्ये नोकरीस होता त्यामुळे त्यांना फुकट तिकीट मिळत असे. तशी त्याची फॅमिली खूप likable होती फक्त माझ्या नवऱ्याची complaint होती की त्यांच्या बॅगा अतोनात जड असतात. नंतर काही दिवसांनी कळलं कि त्याला अमेरिकेला मूर्ती smuggle करण्याच्या आरोपात अटक झाली आहे. नंतर उलगडा झाला की त्याच्या बॅगा कां एवढ्या जड असतात.

त्यानंतर माझ्या नवऱ्याच्या कॉलेजमधल्या मित्राच पत्र अली की त्याचे आईवडील अमेरिकेला येत आहेत तर टूर संपल्यावर २-३ दिवस तुमच्याकडे सोय होईल का? आम्ही लगेच होकार दिला. त्याची टूर संपल्यावर ते आमच्याकडे राहायला आले. आम्ही त्यांना आमची बेडरूम दिली. अमेरिकेत आपली बेडरूम कोणाला देत नाहीत ही प्रथा आम्हाला अजून कळली नव्हती. झोपायच्या वेळेस मी त्यांना म्हटलं की तुम्ही बेडरूममध्ये झोपा आणि काही लागलं तर सांगा. त्यावर बाई म्हणाल्या मला पातळ उशी आणि जाड ब्लँकेट आणि ह्यांना जाडी उशी आणि पातळ ब्लँकेट ठेवा. आणि उशाजवळ पाण्याचा तांब्या आणि पेला ठेवा. मी म्हटलं तांब्या नाही आहे मी पाण्याची बाटली ठेवते.

स्नेहबंध

तीन चार दिवस राहायला आलेले हे लोक तीन आठवडे राहिले. त्यांनी येताना भरपूर कोल्हापुरी चपला आणल्या होत्या. रोज सकाळी १० वाजता ते चपला विकायला म्हणून Manhattan ला जायचे आणि संध्याकाळी घरी परतायचे. उरलेल्या वेळात ते मुलींसाठी अमेरिकेतल्या मुलांची स्थळं बघत होते .३ आठवडे झाले तरी त्यांची जायची चिन्ह दिसेनात . पण नशिबाने smuggler साहेबांचा (तेंव्हा माहित नव्हतं कि हे smuggler आहेत म्हणून) फोन आला कि ते येत आहेत. मग ते दुसऱ्या कोणाकडे तरी राहायला गेले.

आणखी एक कुठलाही संबंध नसलेले पाहुणे आले होते. त्यांनी मला कसा कॉन्टॅक्ट केला हे ऐकण्याजोगं आहे. एक दिवस मला ऑफिसमध्ये फोन आला आणि माझी बॉस Rose रागाने मला सांगायला आली कि तुला फोन आहे. मी फोन घेतला , कुठलाही प्रकारचा संकोच न बाळगता त्यांनी मुद्द्याला हात घातला. तर गृहस्थ म्हणाले आम्ही तुझ्या मैत्रिणीचे नातेवाईक आहोत तर आज संध्याकाळी आम्ही चार जण तुमच्या कडे जेवायला येऊ . नका येऊ म्हणायची काही हिम्मत झाली नाही. संध्याकाळी हे गृहस्थ आपली बायको आणि एक वयस्कर कुटुंब घेऊन हजर झालं. मी नुकतीच ऑफिस मधून आले होते. त्या वयस्कर बाई एक सारख्या मला विचारायला लागली " झालं का हो जेवण? नाही म्हणजे वेळेवर नाही जेवलं तर भूक मरते . आम्ही सकाळपासून फक्त एका कॉफी वरती आहोत. कॉफीला एक डॉलर पडला. फारच बाई महाग आहे इथे. " मी त्यांना म्हटलं मी पण आत्ताच ऑफिस मधून आले आहे तर जेवणाला जरा वेळ लागेल तोपर्यंत चहा आणि बिस्कीट घ्या". ज्या गृहस्थांनी मला फोन केला होता ते Times Of India मध्ये मोठ्ठ्या हुद्द्यावर होते. ते आमच्या घरातून खूप जणांना फोन करून सांगत होते " आमची तुमची काही ओळख नाही पण अमक्याकडून तुमचा फोन नंबर घेतला आणि तुमच्या सवडीप्रमणे आम्ही तुमच्याकडे जेवायला येऊ". नंतर ते म्हणाले कीं एका वयस्कर बाईकडे त्यांची राहायची सोय झाली आहे पण त्या म्हणाल्या माझ्याकडे जेवणाची सोय होणार नाही" म्हणून हे लोकांकडे जेवणासाठी वार लावत होते. मला एका गोष्टीचे कुतूहल होते कीं ह्यांना माझा ऑफिसचा फोन नंबर कसा मिळाला. कारण नंबर फक्त माझ्या नवऱ्याला दिला होता तो सुद्धा emergency साठी. आमच्या डेस्क वर फोन नव्हते फक्त त्या खडूस supervisor च्या डेस्क वर फोन होता. पाहुण्यांनी मोठ्या अभिमानाने सांगायला सुरुवात केली.त्याच काय झालं मी खांडेकरीकडे गेलो होतो तेंव्हा तुमचा aerogram त्याच्या डेस्कवर पडला होता. मी तुमचा address लिहून घेतला म्हटलं अमेरिकेच्या टूर वर चाललो आहोत तर अडीअडचणीला उपयोगी पडेल. नंतर बेबीला विचारलं काय करते तुझी मैत्रीण तर ती म्हणाली Hearst Magazines मध्ये काम करते. मग इथे आल्यावर सरळ Hearst Magazines चा नंबर काढला आणि त्यांना सांगितलं कि मला ह्या व्यक्तीशी बोलायचं आहे emergency आहे. मग त्यांनी फोन कनेक्ट करून दिला. हे ऐकून मी बेशुद्ध पडायच्या मार्गावर होते. निर्लज्जपणाची कमाल.. तीसुद्धा एक जेवण सोडवण्यासाठी.

अधिवेशन अटलांटिक सिटीला आहे हे ऐकल्यावर आणखी एक आठवण जागृत झाली. आम्ही अटलांटिक सिटीला जायचं म्हणून माझ्या नवऱ्याने सुट्टी घेतली होती. जरा आरामात अकराच्या सुमारास निघायचं असं ठरलं. सकाळी सात च्या सुमारास doorbell वाजली. मी झोपेतच होते पण माझ्या नवऱ्याने दार उघडलं , एक बाई आणि लहान मुलगा दारात उभे होते. मुलाच्या हातात लंच बॉक्स होत. ती बाई म्हणाली " मै आपकी पडोसन , ये आज आपके साथ राहेगा. इसकी babysitter बिमार है " आणि ती बाई निघून पण गेली. नवऱ्याने मला उठवलं आणि म्हणाला कोणीतरी बाई तिच्या मुलाला आपल्याकडे सोडून गेली आहे. मी अर्धवट झोपेत होते.
मी : मुलगा तुझा नाही ना मग लक्ष देऊ नकोस. नवरा : आचरटपणा बंद कर. उठ आता, किती झोपशील काय सुमार ? शेवटी मी डोळे चोळत बाहेर आले. पाहिलं तर तो मुलगा घाबरलेल्या सशासारखा बसला होता. त्याला आईबरोबर elevator मध्ये बघितल्याच आठवलं. मी त्याला TV वर कार्टून्स लावून दिली आणि आमचा दिवस त्याचं babysitting करण्यात गेला.
अश्या बऱ्याच प्रसंगांना तोंड देता देता पांच वर्ष कशी निघून गेली हे कळलंच नाहीं. शेवटी पाहुण्यांना कंटाळून आम्ही न्यू यॉर्क सोडून मिशीगनला आलो.
New York सोडल्यावर एक खंत म्हणजे Flushing मध्ये राहून सुध्दा Flushing Meadows ला टेनिस पाहायला गेलो नाही की Shea स्टेडियम पाहिलं नाही !

Sushama Desai Sukhtankar
shama226@gmail.com
248-930-1325

With Best Compliments from

Prabhakar Patil

स्नेहबंध

आठवणीतील एक आगळावेगळा गणेशोत्सव

'आठवणीतील एक आगळावेगळा गणेशोत्सव' ह्या विषयावर जेव्हा लिहिण्याचा विचार करू लागलो तेव्हा फारच गोंधळाची स्थिती झाली. ह्या लेखातून, माझा एखाद्या वर्षी लक्षात राहणारा गणेशोत्सव नसून तो कसा प्रत्येक वर्षी आठवणीत राहीला ह्याचा मागोवा घेण्याचा प्रयत्न आहे. प्रत्येक गावाचा, शहराचा स्वतःची ओळख असणारा गणेशोत्सव आहे. उत्सव तेथील भौगोलिक परिस्थिती, राजकीय वारसा, सामाजिक जाणीव आणि एकंदर जनसमुदायाच्या चालीरीती, कला-संस्कृतीचे प्रतिबिंब असते. तसेच प्रतिबिंब मला पुण्यनगरीच्या उत्सवात दिसते. जन्माने जरी नाशिककर असलो तरी मागील बऱ्याच पिढ्या आम्ही पुणेकरच आहोत. त्यामुळे पुण्यनगरीतील गणेशोत्सव हा माझ्या दृष्टीने अग्रस्थानी आहे. ह्या लेखातील निरीक्षणे, पुण्यनगरीतील ठिकाणे, इतर संदर्भ ही माझ्या जवळपास ३०-३५ वर्षातील गणेशोत्सव काळातील केलेल्या भटकंतीचा, अनुभवाचा खजिना आहे.

पुण्यातील उत्सव हा प्रत्येक वर्षी आकर्षणाचा विषय असतो. मग 'खड्डेमु'क्त मांडव असो की गुलालाची कित्येक टन उधळण असो, कोणी वर्गणी मागणार नाही म्हणून पत्रकार परिषद घेऊन जाहीर करतात तर मंडळाची सुवर्णजयंती मोठ्या थाटात साजरा करण्याचे नियोजन करतात. कोणी पारंपरिक देखावा करण्यात व्यस्त असतो, तर कोणी प्रसिद्ध चित्रपटातील सेट चा काही भाग देखावा उभा करण्यासाठी अगोदरच रस्ता अडवून काम सुरू करतो! प्रत्येक वर्षी मिरवणुकीचा लागणारा वेळ हा उत्सुकतेचा आणि त्याच्या अनुषंगाने येणाऱ्या प्रशासनातील त्रुटी किंवा कल्पकतेने केलेल्या नियोजनाचा चर्चेचा विषय असतो. मानाच्या पहिल्या पाच गणपतींचा साधेपणा तर त्याचबरोबर श्रीमंत दगडूशेठ आणि मंडई गणपतीची भव्यता आणि थाट अनुभवण्यासाठी देखील भक्त श्रद्धापूर्वक भेट देतात. परंतू शासकीय प्रशासन मात्र उत्सव आनंदात आणि कोणतेही गालबोट लागू नये म्हणून नियोजनात व्यस्त असतात.

पुण्यातील गणेशोत्सव हा प्रत्येकाच्या घरातून सुरू होऊन शेवट मात्र लक्ष्मीरोडवरील विद्युत रोषणाईत विराजमान झालेल्या 'दगडूशेठ' आणि 'मंडई' ह्या बाप्पाचे दर्शन घेऊनच होतो. माझ्याबाबतीत गणपती हे फारच श्रध्देचं आणि आवडीचं मॉडेल आहे. मी लहानपणी हातात पेन्सिल घेतल्यावर कागदावर गणपतीच काढत असे! पाहुणेमंडळीसमोर किंवा पाहुणे म्हणून गेल्यावर, गणपती काढणे हा एक कार्यक्रमच असे. अर्थात त्या काळात मोबाईल, दूरचित्रवाणी आणि व्हिडिओ गेम हे पर्याय नव्हते. गणपती आणि मातीकाम ह्यांची ओळखच माझ्या प्राथमिक शाळेत झाली.

आमच्या घरात दहा दिवसांचा गणपती आणि गौरीपूजन आहे. त्यामुळे ऑगस्ट महिन्यात घरात आवराआवरी आणि रंगकाम होत असे. गणपतीची जागासुद्धा ठरलेली एक दिवळी होती. वडिलांना गणपतीची आरास करण्याची हौस आहे. कधीकधी जागेत बदल होत, परंतू गणपती मात्र उंचीवरच दिवळीत किंवा लाकडाच्या कपाटात वरच्या मांडणीवर विराजमान होत असे. मी राहात असणाऱ्या वाड्यात प्रिंटिंग प्रेस आणि कागदाचे व्यावसायिक होते. त्यामुळे कागद, पुठ्ठे, त्याला लागणारी खळ किंवा सरस हे साहित्य उपलब्ध होते. पूर्वी थरमोकॉल जास्त वापरत नसत त्यामुळे पुठ्ठयाची मखर आणि त्यास मागून चिकटवलेले पतंगाचे किंवा जिलेटिनचे रंगीत कागद, भारदस्तपणा येत असे! त्याच्याभोवती सोनेरी, चंदेरी जर किंवा दोरा फिरवून मखर आणखीनच चमकत असे. अश्याप्रकारे माझी घरातूनच कलेची उपासना होत असताना पुण्यनगरीतील भव्यदिव्य उत्सवात मी एक कलाप्रेमी म्हणून सामील होऊ लागलो.

पुणे शहरातील गणेशोत्सव हा इतर शहरांपेक्षा वेगळा आहे. त्याची गंमत मांडवाच्या पूजनापासून ते मांडवाच्या शेवटचा खांब उतरवण्यापर्यंत आहे. माझा उत्सव मांडवापासून होतो. आता मांडव-उभारणीत काय पाहायचे? तर मांडवावरून त्या मंडळाच्या त्या वर्षी होणाऱ्या देखाव्याची कल्पना येत असे. मांडवाच्या आकारमानावरून त्या वर्षी मंडळाचा गणेशोस्तव आनंदात असेल की काही कारणास्तव अगदी जुजबी प्रमाणात असेल ह्याची कल्पना येते.



मांडव उभा जास्त की आडवा ह्यावर तेथील देखाव्याचे स्वरूप समजत असे. मांडव जर एका चौकातून सुरू होऊन पुढच्या चौकात संपत असल्यास तर ते वर्ष मंडळाचे रौप्य, सुवर्ण, हीरक किंवा शताब्दीचे असावे ह्याचा अंदाज येतो. तेथे सांस्कृतिक कार्यक्रमाची पर्वणी असणार यात शंका नाही. मला अश्या उत्सवाच्या काळात विश्वकर्माचे बरेच अवतार पृथ्वीवर वावरत असल्याचा भास होतो. कलाकार मंडळी नेत्रदीपक कलाकृती करण्यात दिवस रात्र एक करून काम करतात. कोणी नोकरी, व्यवसाय सांभाळून रात्री मांडव, देखावा उभारण्यात मदत करतात. पुण्यातील वर्तमानपत्र देखील अश्या मंडळांची तयारी चालू असल्याची बातमी छायाचित्रासह छापत असे. दहीहंडीच्या कार्यक्रमानंतर देखावे उभारण्याच्या कामास वेग येत असे. स्थानिक कलाकारांबरोबर चित्रपट सृष्टीतील कलाकार मंडळी सुद्धा काही दिवस कलेच्या अधिपतीसाठी राखून ठेवत.

स्नेहबंध

पुण्यातील उत्सवात साधारणपणे गजबजलेल्या वस्तीत जसे कसबा, भवानी, नाना, घोरपडी, रास्ता, सोमवार, मंगळवार, बुधवार इत्यादी पेठा व फणी, डाळ, गौरी, बोहरी आळी तसेच पवळे चौक, डूल्या मारुती, सोन्या मारुती, फडके हौद, भोपळे, अपोलो, शाहू , कस्तुरी चौक इथे सामाजिक, पौराणिक, ऐतिहासिक देखाव्यांची परंपरा होती. तसेच शहरातील शनिवार, नारायण, सदाशिव, नवी पेठ , डेक्कन, तुळशीबाग, मंडई , स्वारगेट, शिवाजीनगर, लक्ष्मी रोड परिसरात कलात्मक, नावीन्यपूर्ण, देखावे पाहण्यास मिळतात. पुण्यात नातुबाग, शनिपार, हत्ती गणपती, टिळक रोड, खडकमाळ, ह्यांची संगीतावर विद्युत रोषणाई असते. जुन्यानव्या चित्रपट गाण्यांवर हे देखावे फारच नयनरम्य वाटत असत. त्यातच काही वर्षे मंडळांनी गाण्यांवर थिरकणारी कारंजी सुद्धा देखावे म्हणून सादर केली.



गणेशोत्सव आणि ढोल पथक हा अवर्णनीय असा अनुभव आहे. पुणे शहर हे व्यायामाच्या तालमी साठी सुद्धा प्रसिद्ध आहे. वानगीदाखल काही तालमींची नावे अशी आहेत: विराची तालीम, निंबाळकर, खालकर, नगरकर, कुंजीर, जगोबादादा वस्ताद, गोकुळ, तालीम. तेथील पैलवान मंडळी ढोल आणि ताशा वाजविण्याची परंपरा जोपासत होती. शहराजवळील खेड्यातील युवकसुद्धा झांज आणि लेझिम वापरून उत्कृष्ट खेळ सादर करीत असत,



पुण्यनगरीत लोकमान्यांनी ठरवून दिलेल्या पद्धतीने विसर्जन मिरवणूक अगदी दिमाखात पार पडते. साधारण सकाळी १०.३० वाजता मानाच्या (पहिला कसबा) गणपतीची महापौरांच्या हस्ते आरती करून पालखी मार्गस्थ होते. त्या मागोमाग मानाचे गणपती तांबडी जोगेश्वरी, गुरुजी तालीम, तुळशीबाग, आणि केसरीवाडा क्रमानुसार सामील होतात. मिरवणुकीचा जुना मार्ग हा लक्ष्मी रोडवरून अलका टॉकीज चौकातून नदीच्या घाटाकडे जातो. प्रत्येक वर्षी वाढणाऱ्या गर्दीमुळे आता काही पर्यायी मार्ग देखील सुरू झाले आहेत. मिरवणुकीचे नियोजन करण्यासाठी खास महाराष्ट्र पोलीस दलातील अनुभवी कर्मचारी आणि वरीष्ठ अधिकारी आमंत्रित केले जातात.



सूर्यास्तानंतर विद्युत दिव्यांची आरास सादर करणाऱ्या मंडळांची रांग सुरू होते. सारा परिसर लख्ख दिव्यांनी उजळून निघतो. मिरवणुकीत कार्यकर्त्यांचा उत्साह शिगेला पोहोचलेला असतो. मंडळाचे ते वर्ष जर विशेष असेल तर कार्यकर्ते कुटुंबा सोबत मिरवणुकीत सामील होतात. बाप्पा मात्र त्या झगमगाटात आपल्या भक्तांना आशीर्वाद देत पुढच्या वर्षी येण्याचे आश्वासन देत असतो.

योगेश औंधकर

Troy, Michigan,USA

C4D
MORTGAGE
C4D MORTGAGE COMPANY, LLC
OPENING DOORS — CLOSING LOANS
WHY C4D MORTGAGE COMPANY?
Best in business since 2003 due to our dedication in customer service.
Lowest rates on the market.
5-star rating on Zillow.
Exceptional team of educated, licensed and experienced loan officers.
Refinance, purchase, or cash-out loans.
Zero closing costs.
Call today for a free consultation
(586)421-5092
NMLS #151261
WWW.C4DMORTGAGE.COM

SAT Math & English Test Prep Classes
The EDucation ENrichment Center
We have experienced teachers provide a structured approach to help students learn new math concepts, improve language arts abilities, and boost test scores
ACT/SAT Test Prep
Math
English
ACT Prep course
SAT Prep course
Test practice and reviews
K-5 Math
Pre-Algebra
Algebra I
Algebra II
Geometry
Trigonometry
Pre-Calculus
Calculus
K-12 Language Arts
Grammar
Reading Comprehension
Writing
Vocabulary
If you are looking for results, call us:
Register now
Ed-En Center
www.ed-en-center.com
248.528.1455
2328 Livernois Road, Troy, MI 48085

आई संपावर गेली तर

श्लोक वर्तक, ट्रॉय शाळा, इयत्ता तिसरी

विचार करा, आई संपावर
गेली तर काय होणार?
चांगलं जेवण नाही मिळणार,
तुझ्याबरोबर अभ्यास कोण
करणार,
आणि सजा कशी करणार.

आई संपावर गेली तर चांगलं
जेवण नाही मिळणार.
कोजू कतली, चिवडा, व जिलबी
नाही मिळणार.
मला असं झालं तर मी रडणार
आणि मी चांगला नाही होणार.

आई संपावर गेली तर अभ्यासाला
मदत कोण करेल?
घरचा अभ्यास, शाळेचा अभ्यास,
व परीक्षेसाठी कोण मदत करणार.
मला असं झालं तर मी सगळ्या
परीक्षांमध्ये नापास होईल
आणि मी रडणार.

आई संपावर गेली तर मला
चांगलं जेवण नाही मिळणार
आणि मला अभ्यासाला कोण
मदत करणार.
तुला असं झालं तर तू काय
करणार.

श्लोक वर्तक
ट्रॉय मराठी शाळा

With Best Compliments from

Gangadhar and Pushpa Vaishampayan

नाट्यसंपदा - एक संस्मरणीय अनुभव

गेली दोन वर्ष करोनामुळे आपण सगळेच घरी बसलो होतो. आपण प्रेक्षक तर कार्यक्रम बघायला आसुसलेले होतोच, पण कदाचित आपल्यापेक्षा काकणभर अधिक डेट्रॉईटमधले कलाकार त्यांची कला सादर करायला उत्सुक होते. शनिवारी, ७ मे, २०२२ रोजी MMD च्या गुढी पाडव्याच्या कार्यक्रमाला त्याचाच प्रत्यय आला! डेट्रॉईटच्या गुणी कलाकारांनी 'संगीत नाट्यसंपदा' सादर करताना संगीत, नाट्य आणि नृत्य, या कलागुणांची अक्षरश: उधळण केली आणि चारशेहून अधिक रसिकांना मंत्रमुग्ध करून टाकलं! मिशिगनचा न संपणारा Winter सरून जशी अचानक झाडांना पालवी फुटू लागते, फुलझाडं बहरू लागतात आणि पक्ष्याचं कूजन सुरु होतं, तसंच ग्रोव्स हायस्कुलमध्ये गाण्याचे स्वर घुमू लागले, घुंगरांच्या नादात पावलं थिरकली आणि अभिनयाच्या तेजाने जणू थिजलेल्या रंगमंचाने कात टाकली... अवघं प्रेक्षागृह उजळून निघालं! "डेट्रॉईटमधली कला अजून जिवंत आहे" अशीच जणू दिलेली ती तुतारीची एक खणखणीत ललकारी होती..!

संजय मेहेंदळे लिखित आणि उमा कानडे दिग्दर्शित 'संगीत नाट्यसंपदा' हा कार्यक्रम म्हणजे जणू संगीतप्रेमींसाठी, नृत्याच्या चाहत्यांसाठी आणि नाटकवेड्यांसाठी एक पर्वणीच होती. 'पंडितराज जगन्नाथ', 'संगीत शारदा', 'संगीत सुवर्णतुला' आणि 'प्रीतिसंगम' या चार नाटकांतले प्रवेश एका अनोख्या पद्धतीने एकत्र आणले होते. संजय मेहेंदळेंच्या लेखांचा आणि कवितांचा आपण आत्तापर्यंत आस्वाद घेत आलेलो आहोत, पण या कार्यक्रमामुळे संजयमधला नाटककार दिसून आला. 'सूत्रधार' आणि 'नटी' या पारंपरिक पात्रांच्या आधारे त्यांनी हा कार्यक्रम इतका सुंदर गुंफला होता, की वसंत ऋतूत बागेतली निवडक फुले वेचून कुणीतरी त्याचा सुंदर गजरा करावा आणि आपल्या हातात ठेवावा, असा तो अनुभव होता.

नमन नटवरा विस्मय कारा | आत्म विरोगी कुतूहलधरा ||

नांदी सुरु झाली आणि काहीच क्षणांत प्रेक्षकांना पूर्वीच्या काळात घेऊन गेली. या नांदीत नक्कीच काहीतरी जादू असली पाहिजे... त्यानंतर सूत्रधाराच्या भूमिकेत विक्रांत पटवर्धन आणि नटीच्या भूमिकेत अनघा हुपरीकरने येऊन अभिनयाची अशी काही फटकेबाजी सुरु केली की त्यांना डेट्रॉईटमधले "हौशी" कलाकार म्हणताना आपली जीभ अडखळेल याची त्यांनी पुरेपूर काळजी घेतली. एक सद्विचारी, भाषेवर प्रभुत्व असलेला आणि पुणेरी पगडी घातलेला सूत्रधार आणि नऊवारीतली, काहीशा गावरान बाजात, पण अगदी ठसक्यात बोलणारी नटी... यांनी कधी हसवत, कधी संगीत नाटकांची माहिती देत, कधी एखादं पद गात, तर कधी आयुष्याचे सार सांगत कार्यक्रमावरची पकड घट्ट धरून ठेवली. वाचिक अभिनायाइतकाच त्या दोघांचा स्टेजवरचा वावरही अगदी सहज होता.

सादर झालेल्या नाट्यप्रवेशांत उल्लेख करण्यासारख्या अनेक गोष्टी होत्या. 'पंडितराज जगन्नाथ' या पहिल्याच प्रवेशात अनुप बापटने गायलेलं 'सावन घन गरजे बजाये' गाणं, त्याला वादकांनी दिलेली साथ आणि त्यावर उल्का भिडे आणि तिच्या सहकार्यांनी केलेलं कथक नृत्य थक्क करणारं होतं! मागे visualsवर राजवाड्यासमोरची बाग दाखवली होती. त्यात कारंजी उडत होती. गाणं सुरु झाल्यावर वीजा चमकून पाऊस पडू लागला, इतकंच नव्हे तर इंद्रधनुष्यपण उमटलं! राग मिया मल्हारातलं गायन, वादन, नृत्य, प्रकाशयोजना आणि मागच्या visualsने जणू पाऊस पडत असल्याचा आभास निर्माण झाला!

'संगीत शारदा' प्रवेशात उमाचं दिग्दर्शन उठून दिसत होतं. चैत्रगौरीची वातावरणनिर्मिती खास झाली होती. परकर-पोलकं घालून नाचणाऱ्या-बागडणाऱ्या छोट्या मुलींनी गंमत आणली. ऋषी पाटील या ६ वर्षांच्या चिमुकल्याने प्रेक्षकांची विशेष दाद मिळवली. याच प्रवेशात नावाप्रमाणेच असलेल्या 'स्वराली' बिवलकरने "अवघे पाऊणशे वयोमान" हे गाणं मस्तं रंगवलं!

'संगीत सुवर्णतुला'चा प्रवेश देखणा झाला! गौरव कुलकर्णी (नारद मुनी), सरिता देशपांडे (सत्यभामा), वेदांती पारगांवकर (रुक्मिणी) आणि अनुप बापट (कृष्ण) यांचा अभिनय आणि गौरव-अनुपची गाणी याला कारणीभूत होती. मागे visualsमध्ये पारिजातकाचं झाड दाखवलं होतं आणि त्यातून फुलांचा सडा पडत होता. या प्रवेशात विशेष लक्ष वेधून घेतलं ते नयना ओक आणि तिच्या टीमने केलेल्या costumes ने! भरजरी पोशाख आणि त्यावर दागिन्यांचा चढवलेला साज, यामुळे प्रवेश अधिक "समृद्ध" झाला. केवळ याच प्रवेशासाठी नाही तर संपूर्ण कार्यक्रमातल्या स्टेजवरच्या जवळपास ४० कलाकारांसाठी भारतातून costumes करून घेणे हे सोपं काम नाही. पण नयना आणि तिच्या टीमने अगदी नेटाने ते काम पूर्ण केलं.

'प्रीतिसंगम' प्रवेश सुरु होताच दिसले ते गुणी कलाकारांनी बनवलेले प्रॉप्स. पेटलेली चूल, लाकडी देव्हारा, त्यात जळते दिवे, भांडी घासायची जागा, कपडे वाळत घालायचा स्टॅन्ड, पातेली, दळण करायचं जातं... इतरही प्रवेशातले प्रॉप्स सुंदर होते. संगीत नाटकांचं पुस्तक, संगमरवरी रेलिंग, पायऱ्या, गॅलरीची सोनेरी रेलिंग, सोनेरी खांब, चैत्र गौरीच्या पूजेचे साहित्य... सगळेच प्रॉप्स अव्वल दर्जाचे होते. आरती नेवाळकर, सुनील केळकर आणि इतर बॅकस्टेज टीमचं खूप खूप कौतुक! श्रुती बोसने बॅकस्टेज टीमचं नेतृत्व नेहेमीसारखंच उत्तम केलं. सगळे set-changes अगदी flawless झाले! श्रुती फक्त बॅकस्टेजलाच नसते तर संपूर्ण कार्यक्रमाचा ती बॅकबोन असते हे तिच्याबरोबर काम केलेल्या सगळ्यांना ठाऊकच आहे!

कार्यक्रमाचा शेवट दिंडीने झाला आणि भक्तीरसात प्रेक्षकवर्ग न्हाऊन निघाला. अनुप आणि इतर गायकांचे सूर इतके सच्चे लागले होते की शेवटी visuals वर जेव्हा विठ्ठलाची प्रतिमा आली तेव्हा त्या क्षणापुरते सगळे कलाकार आणि रसिक प्रेक्षक त्या पांडुरंगाबरोबर एकरूप झाल्याची अनुभूती आली.

अनुप बापट किती अप्रतिम गातो हे आता डेट्रॉईटला नव्याने सांगण्याची गरज नाही. साथीला तबला-पेटी घेऊन तो नुसता गायला बसला तरी प्रेक्षक भान हरपून त्याचं गाणं ऐकू शकतात. या कार्यक्रमात त्याचं गाणं अजून खुलून आलं. प्रेक्षकांना ते अधिक भावलं. अनुपच्या जोडीला स्वराली बिवलकर आणि गौरव कुलकर्णी हे दोघेही खूप छान गायले. मला ते दोघेही डेट्रॉईटचे “new finds” वाटले.

विक्रांत आणि अनघानेही निवेदनाचा भाग असलेली गाणी सुरात गायली. इथे अजून एक नावाचा उल्लेख करावासा वाटतो, ते म्हणजे मुक्ता कुलकर्णी. दोन प्रवेशात तसं छोटंच काम होतं तिला, पण त्यातही तिने अभिनयाची चुणूक दाखवली.

गायकांना उत्तम साथ दिली ती वादकांनी. हार्मोनियमवर होते अनिल अर्काटकर, व्हायोलिनवर अनुज अर्काटकर, तबल्यावर गिरी ऎगळीकर आणि तानपुऱ्यावर हरेन दोडके. दोन तासांच्या कार्यक्रमांत live साथ संगत करणं सोपं नसतं. पण या सगळ्यांनी अप्रतिम वादन केले. सुवर्णतुलासाठी एक छोटा बॅकग्राऊंड पीस मृणालिनी अर्काटकरांच्या आवाजात रेकॉर्ड केला होता. दर्दी रसिकांनी त्यांचा आवाज लगेच ओळखला!

संगीताचा कुठलाही कार्यक्रम असला तरी “साऊंड”ची जबाबदारी अभिजय काणेवर सोपवावी आणि निश्चिन्त राहावं! कालच्या कार्यक्रमांत २३ single ear mics होते, वादकांचे वेगळे mics होते, घुंगरांच्या आवाजासाठी एक foot mic होता. अभिजयने ही जबाबदारी लीलया पार पाडली. अशा प्रकारचा कार्यक्रम यशस्वी होण्यामागे “साऊंड” चा मोठा वाटा असतो. त्यामुळे अभिजयचे विशेष कौतुक! आनंद पुरंदरे आणि अजय कानडे यांनी केलेली प्रकाशयोजना उत्तम होती. प्रत्येक ब्लॅकआउट आणि फेड-इनला लागणारा वेळ सारखा होता. यावरून त्यातली शिस्तबद्धता दिसून आली. श्रीनी ऎयंगारने visuals सफाईने operate केली. कार्यक्रमातली सगळी नृत्ये प्रेक्षणीय होती. ‘पंडितराज जगन्नाथ’ मधलं कथक अनघा हुपरीकरने (Asmi Dance Academy) बसवलं होतं, तर शारदा आणि दिंडीतल्या नृत्यांची choreography Funaach Academy of Dance ने केली होती.

आणि आता कॅप्टन ऑफ द शिप - उमा कानडे! हिचं कौतुक करावं तितकं कमी आहे! ५० हून अधिक लोकांची टीम घेऊन या दर्जाचा कार्यक्रम बसवणं अशक्यप्राय असतं. पण उमाने ते चैतन्य पुराणिकच्या मार्गदर्शनाखाली यशस्वीरित्या करून दाखवलं. करोनामुळे हा कार्यक्रम या आधी दोनदा रद्द करावा लागला होता. तरीसुद्धा टीमला धरून ठेवणं, प्रेरित ठेवणं, ही सोपी गोष्ट नाही. यात उमाच्या दिग्दर्शन कौशल्याबरोबर नेतृत्वगुणही दिसून येतात. सगळ्यांच्या कलाने घेऊन, हसत खेळत काम करणे हे उमाच्या स्वभावातच आहे. या कार्यक्रमात बऱ्याच जणांनी पहिल्यांदा अभिनय केला. पण असं मुळीच जाणवलं नाही. याचं श्रेय जितकं त्या कलाकारांच्या कष्टांना आहे तितकंच ते उमाच्या दिग्दर्शनालाही आहे. तिच्या दिग्दर्शनातला हा महत्वाचा गुण मला जाणवला. महाराष्ट्र मंडळ ऑफ डेट्रॉईटने नेहेमीच भव्य मंच उपलब्ध करून देऊन लपलेल्या कलाकारांचा शोध घेतला आहे. उमाच्या रूपात सापडलेला एक उत्तम दिग्दर्शक, संजयच्या रूपात सापडलेला एक उत्तम लेखक, अनघा, स्वराली, गौरवच्या रूपात सापडलेले उत्तम नट आणि गायक ही त्याचीच जणू पावती आहे.

प्रोग्रॅम मॅनेजर गार्गी जाधव, प्रेसिडेंट मनोज पाटील आणि व्हाईस प्रेसिडेंट विक्रांत पटवर्धनने अशा कार्यक्रमाला संधी दिल्याबद्दल त्यांचे खूप आभार आणि वर्षातल्या अजून एका यशस्वी कार्यक्रमासाठी अभिनंदन! विक्रांतने अभिनय तर केलाच, सगळे visuals त्याचेच होते आणि शिवाय व्हाईस प्रेसिडेंट म्हणून कार्यक्रमाची मोठी जबाबदारी त्याच्या खांद्यांवर होती. मला खात्री आहे की एक तर त्याला ५-१० हात आहेत किंवा त्याच्या दिवसात २४ पेक्षा जास्त तास आहेत! त्याशिवाय हे एवढं सगळं करणं केवळ अशक्य आहे!

संगीत नाट्यसंपदेच्या शेवटचं विठोबाचं गाणं ऐकून मंडळी पोटोबा करायला कॅफेटेरियात गेले. कार्यक्रमाच्या सुरुवातीला सत्यनारायणाची पूजा केली होती. “With” आणि “without nuts” प्रसाद बघून एखादा कार्यक्रम करायच्या मागे किती विचार असतो हे दिसून आलं. प्रसादाच्या जोडीला वाटली डाळ होती, पन्हं होतं.

कुठलाही कार्यक्रमाच्या मागे असंख्य लोकांचे कष्ट असतात. कष्ट करणाऱ्या सगळ्यांचेच हात दिसतात असं नाही. काही हात अदृष्यही असतात. आपण त्यांच्यासारख्या निःस्वार्थी वृत्तीने कधी काम केले नाही, तर त्या अदृश्य हातांचे आपण ऋण नाही फेडू शकत. वर्षा पाथरे, मंदार देशपांडे, दीपा इंगळे, हर्षद अण्णिगेरी, स्मिता पंडित, अरविंद भोसले, स्मिता नारकर... ही त्यातलीच काही नावं.

कार्यक्रम संपल्यावर कानांत नाट्यसंगीताचे स्वर आणि जिभेवर आम्रखंडाची चव रेंगाळत होती. प्रेक्षागृहातला वसंतोत्सव संपवून बाहेर Spring season चा आस्वाद घेत पावले घराकडे वळाली होती...

- सुशांत खोपकर

kw CENTRAL
KELLERWILLIAMS.
35427 Dodge Park Rd. Sterling Heights, MI 48312
SELL IN A FLASH, CALL KASH!

REALTOR®, KASHMIRA DESAI
YOUR METRO DETROIT EXPERT
View What is *ACTIVE, PENDING & SOLD* in your Neighborhood go to www.kashmira.kwrealty.com
Cell (248) 974 6979 Office (248) 655-7955
realtor.kashmira@gmail.com

SRS

Each Keller Williams Office is Independently Owned and Operated

रसिका तुझ्याचसाठी

अनेक वर्षांपूर्वी डेट्रॉईटमध्ये डॉ. आनंदीबाई जोशी यांच्या आयुष्यावर प्रकाश टाकणारा एक आगळावेगळा एकपात्री कार्यक्रम सादर झाला. ते नाटक नव्हतं, भाषण नव्हतं; पाडव्यानंतर आणि गणपतीच्याआधी तो कार्यक्रम इथे दाखल झाला. त्यासाठी रंगमंच, जागा मिळवणं, मराठी मंडळाच्या वेळापत्रकाच्या कोष्टकात तो बसवणं हे आयोजकाला - महेश कोटणीसला - कठीण वाटू लागलं. पण ही संधी त्याला सोडायची नव्हती म्हणून त्याने स्वतः जबाबदारी घेऊन तो कार्यक्रम घडवून आणला. त्या अनुभवातून एक नवा कलामंच जन्माला आला. महेश, नितीन अंतुरकर, अमित मेहता यांच्यासारख्या हरहुन्नरी मराठीप्रेमींच्या लक्षात आलं की कलेच्या व भाषेच्या चाकोरीबाहेरच्या आविष्कारासाठी एक वेगळं व्यासपीठ हवं. त्यावेळी अभिजित भुसारी मराठी मंडळाचा अध्यक्ष होता. त्याच्या प्रोत्साहनाने काही मंडळी पुढे आली आणि डेट्रॉईटवासियांना एका नव्या उपक्रमाचा लाभ झाला. त्या उपक्रमाचं बारसं केलं भारती मेहेंदळेने: "रसिका तुझ्याचसाठी"

तुम्हाला दूरदर्शनवर गाजलेले 'गजरा' किंवा 'प्रतिभा आणि प्रतिमा' हे कार्यक्रम आठवतात का? तसेच इथले Saturday Night Live सारखे प्रहसनात्मक कार्यक्रम? कुठल्याही संज्ञेत न बसणारे तरी कलाक्षेत्रात प्रमाण म्हणून मानले जाणारे हे ठेवे आहे. ना धड नाटक, ना परिसंवाद... चाकोरीत बसत नाहीत म्हणून ते सादर करणं कठीण जातं. त्यासाठी स्वतंत्र मंच (platform) हवा. दुसरी गोष्ट अशी की मंडळ अनेकदा खर्च व यातायात करून भारतातून कलाकार आणते परंतु दोन-तीन दशकं इथे काढल्यावर आपली अभिरुची बदलेली असते. या कर्मभूमीत रुजलेल्या सहप्रवाश्यांना आपली कला सादर करावीशी वाटते, आपले अनुभव कथन करण्याची इच्छा होते , गप्पांद्वारे आपले मनोगत व्यक्त करावं हे जाणवतं - त्यासाठी अनौपचारिक बैठक मांडणं हाही एक हेतू आहे.

तर वाचकहो, तुमच्यातील सुप्त कलाकाराला हे आवाहन आहे. 'रसिका' साठी आम्हाला तुमची साथ हवी आहे. आता तुम्ही विचाराल; असं खास आम्ही काय करू शकतो? तर वानगीदाखल आतापर्यंत काय घडलं त्याची झलक बघा ....
स्वलिखित ऐतिहासिक नाट्यप्रवेश, कवीने केलेले स्वत:च्या कवितांचे वाचन व गायन, नवप्रकाशित पुस्तकातील उतारा वाचन, राजकीय घटनांवर आधारित छोटे प्रहसन (skit), मुलाखत, एका बिकट प्रवासाचं प्रकाशचित्रांद्वारे वर्णन, कथाकथन, वादग्रस्त चित्रपटातील भाग दाखवून त्याविषयी चर्चा व परिसंवाद ....

मधल्या काळात BMM (२०१७) चे वारे वाहू लागले आणि रसिकांसकट सर्वांचे लक्ष तिथेच खिळले. आता मंडळाचा आवाका वाढला, दशकानुसार एक अशा मोजल्या तर मराठी भाषिकांची आता पाचवी पिढी इथे स्थाईक होते आहे .... त्यातील पहिल्या पिढीच्या शिलेदाराला मानाचा मुजरा करत शुभदा शास्त्री यांनी 'कांचनसंध्या' ही Sitcom लिहिली. तिचा पहिला भाग २०१८ मार्चमध्ये सादर झाला आणि 'रसिका तुझ्याचसाठी' उपक्रमाचे पुनरूज्जीवन झाले. इथे येऊन स्थाईक झालेली आपली काही मराठी मंडळी नृत्य-गायन-नाटक यांव्यतिरिक्त अनेक कला व छन्द जोपासत असतात. कधीकधी ते वेड त्यांचे छन्द खूप वरच्या पातळीवर ठेवतात. अगदी शब्दश:! एव्हरेस्ट बेस कॅम्प पादाक्रांत करणारा गट अशांपैकी एक. त्यांनी 'रसिका..'च्या व्यासपीठावरून आम्हाला एव्हरेस्टदर्शन घडवलं -जे माझ्यासारखे अनेक जण प्रत्यक्षात बघण्याची सुतराम शक्यता नाही! चद्दर ट्रेकची दुर्गम वाट आम्ही तशीच चढून आलो. ज्ञानेश्वरीचे रसाळ निरूपण, कथाकथन, पुस्तक-परिचय, ड्रोन कसा उडतो, मराठी माणसाचा तांत्रिक टेड-टॉक-जगातला प्रवेश .... एक ना अनेक - कुठल्याही विशिष्ट संज्ञेत न बसणारे कार्यक्रम आपल्याला बघायला मिळतात.
अर्थातच दोन वर्ष खंड पडला पण यंदा पुन्हा नव्या उमेदीने रसिकतेला बहर आला आहे. यावर्षी राहुल सोलापूरकरने केलेले प्रतापगडावरचे नाट्यमय आख्यान प्रेक्षकांना एका आगळ्या विश्वात घेऊन गेले.
'रसिका तुझ्याचसाठी' च्या आजीमाजी व सद्य fans साठी एवढी झलक पुरे, नाही का?

- ज्योत्स्ना दिवाडकर

रसिका तुझ्याचसाठी

FOR ALL YOUR MORTGAGE NEEDS

VM

VEMA MORTGAGE LLC

SEBASTIAN GEORGE

Mortgage Broker

Contact me for a free rate quote

1-877-800-VEMA (8362)

saaby74@vemamortgage.com

We are open 24 X 7, 365 days a year

KARMA ENTERTAINMENT LLC

Mukund & Kanchan Wankhede

www.karma-entertainment.com

(313)-316-9132

Indian Fusion Show Production

Stage Lighting Consultation

Audio & Video

Stage Light Plan & Execution

Journey to Canadian Rockies



Last month we had a wonderful trip to the Canadian Rockies. With many uncertainties, including the presence of COVID, we were concerned whether this trip would happen or not, but luckily all restrictions were lifted and finally the day arrived. I had heard about beautiful Banff and Jasper National Parks and was very excited to visit these places.

After traveling to the Everest Base Camp and seeing breathtaking views of Himalayan Mountain Range, I wasn't sure what to expect in the Canadian Rockies. We flew into Calgary, a city in the Western Canadian province of Alberta. The 3rd largest city in Canada, it is as diverse and beautiful as Toronto and Vancouver. Calgary is situated between Rocky Mountain foothills and the Canadian Prairies. Downtown Calgary is lively, clean and beautifully decorated by hanging flowers all over the city. Huge flower baskets draped all over the city seem to mark Canadian summers! Niagara on the Lake, Niagara Falls, Vancouver, or Calgary are no exception.

On the 1st day the Sun, already on the horizon greeted me at 5:30 AM. It was too beautiful to stay indoors and I decided to go running. I love to explore new cities early in the morning. You get to see the city waking up from the previous night's hustle-bustle. Calgary was refreshing with its crispy weather. Birds chirping in the surrounding, invited me to be part of nature. The iconic Calgary Tower is in downtown. There is a lot to see- Olympic Plaza, art & sculptures at every corner, gardens, tall buildings, great restaurants and Chinatown.

The Cultural District area downtown houses the "Famous Five" statue, also known as **The Valiant Five. Built to honor** the five prominent Canadian women who advocated for eligibility of Women to Senators to the Supreme Court, the statue recognizes this as a step towarsd equality for women and start of the first wave of feminism.

We were lucky to catch another interesting event - the famous Wild West show "Stampede"! It is a 10 day event and considered as the greatest outdoor show with the world's largest rodeos, parade, concerts, and agricultural competitions. This show is held every year in July and attracts over one million visitors. It was fun to visit the Stampede Park. Each year, a queen and two princes are selected as Stampede Royalty. They are chosen in an open contest but have to be residents of Alberta. This 'Royal trio' serves a one-year term and makes appearances in southern Alberta and North America eventually becoming members of Calgary Stampede Queens' Alumni association.

Journey from busy Calgary to the small towns of Waterton, Banff and Jasper National Park was like icing on a delicious dessert. As we were driving, we had a mesmerizing view of an enormous mountain range, most of the peaks were covered with snow. Seeing these massive mountains, in one minute you feel so tiny as a human being & next minute you become quiet, get absorbed in nature and suddenly you are part of everything you are seeing, as if you and those mountains are one. That "aha experience" leads to a spiritual moment, reminiscent of the serene feeling one gets after reading the Vedanta philosophy.

Banff National Park is huge and highly commercialized, full of tourists! It was fascinating to see so many Indian people and Indian restaurants there. The Park has lots of waterfalls, lakes, and hiking trails. I had a scary and interesting experience in Banff. Being in a beautiful park with tree covered trails running along rivers & waterfalls, I felt not running on those trails would be missing out on a real treasure. As is my custom, I went for a run around 5.30 am. Halfway through, from a little distance I saw an animal on the side of the trail, about the size of a deer. We are used to seeing deer in Michigan, so I thought, "no big deal, it is just a deer, I will just keep on the trail".

But as I came closer, behind that animal, came another big animal as big as a horse, must be the mother …. And it suddenly dawned on me that it was NOT a deer but something else. Still, I thought, I will be fine as long as I keep running past them. But that big animal didn't think that, maybe being a mother, she wanted to protect her baby, so she came on the trail and blocked my path, she wasn't going to let me pass! There was no one around and I really wasn't sure what to do, whether to run fast or scare the animal. But the animal was big and not happy, so I just stopped in my tracks. Without making direct eye contact, I assessed the situation and slowly took a few steps back. No luck. Both the animals continued blocking my path and from the corner of my eyes, I could see them looking at me. I tried retreating and walked back carefully. Once I was a safe distance away, I just ran with all my strength. After coming back to our hotel, I shared my experience with a few more people and I came to know that my scary encounter was with an Elk! Female Elk don't have antlers. Turns out that Elks are one of the most dangerous and strong animals and they do attack humans. I was overcome with mixed emotions, fear , relief, and gratitude - all at the same time. I was thankful to those who guided me on what to do in those quick moments. I have been to the Himalayas (EBC) and on the Appalachian trail (AT), but this was a unique experience that I will never forget.

स्नेहबंध

पुन्हा एकदा....

प्रवेश संपला, प्रयोग नाही; पडदा
अजून पडला नाही
नव्या दमाने, रंग नव्याने; पुन्हा
एकदा लावून पाहू
.
जोर संपला, जोष नाही; स्वप्ने
अजून विरली नाही
नव्या दमाने, मूठ नव्याने; पुन्हा
एकदा वळून पाहू
.
साज संपला, साथ नाही; मैफील
अजून उठली नाही
नव्या दमाने, गीत नव्याने; पुन्हा
एकदा गाऊन पाहू
.
चढ संपला, उतार नाही; घाट अजून
सरला नाही
नव्या दमाने, वळण नवे हे; पुन्हा
एकदा घेऊन पाहू
.
अर्धा संपला, सगळा नाही; पेला
अजून सरला नाही
नव्या दमाने, उत्साहाने; पुन्हा
एकदा भरून पाहू
.

- संजय

फुलपाखरू

छान किती दिसते फुलपाखरू
वाऱ्यासांगे उडे भुरुभुरु
रंगीत फुलांचे मोहक दालन
देवाने दिधले अनोखे आंदण
इथे बसावे का तिथे बसावे
कुणा फुलाला बरे पुसावे?
सारीच दिसती भारी गोड
नको नको कुणाचाही हिरमोड
पंख पसरावे, कधी मिटावे
रंग गंधासी तल्लीन व्हावे
मोहक सुंदर द्यावे घ्यावे
क्षणाक्षणाचे आयुष्य जगावे

- संगीता मोघे

VEG-O-RAMA
BURGERS·WRAPS·BOWLS
veg-o-rama.com

CATERING FOR ALL OCCASIONS

CUISINES :MARATHI, RAJASTHANI, PUNJABI, GUJARATHI, SOUTH INDIAN

LIVE STATIONS

Chaat - Bhel Puri, SPDP, Aloo Tikki, Dahi Vada, Samosa, Samosa Chaat, Pani Puri, Papadi Chaat

Chowpaty Chaat - Kacchi Dabeli, Vada Paav, Paav Bhaji, Chhole Bature, Misal Paav

Dosa - Plain, Masala, Spring, Cheese, Mysore, Nutella, Jain, Pavbhaji, Paneer, Pizza

Pasta - Fettuccine Alfredo, Gnocchi Pesto, Indian Masala Penne, Angel Hair Parmesan

Chinese - Noodles ,rice Sauces - Schezwan (spicy), Manchurian (smoky), Hakka (sweet)

Mexican - Tacos - Hard / Soft

Kathi Roll - Paneer Tikka, Chhole, Chic'n

American - Burgers, Fries

Appetizer - Gobi Manchurian, Kung Pao Tofu, Crispy Corn, Honey Garlic Tofu, Chilli Honey Potato, Crispy Chana

Bbq Station - Paneer, Tofu, Eggplant, Okra, Potato, Jalapeno

Sweet Tooth - Falooda, Panna Cotta, Kulfi, Rasmalai, Double Ka Meetha, Tiramisu

CALL US
(734) 335-3952

Reva Jogdeo
Age 7yrs

वसुधैव कुटुम्बकम

जगात समृद्धीचे झरे तेहरान आणि कुवैतमध्ये पाण्यासारखे वाहतांना दिसतात.
शक्ती, सत्ता, घमेंड यांची चढाओढ न्यूयॉर्क आणि मॉस्कोत गगनाला भिडलेली दिसते; तर शोभा, सुषमा आणि सौंदर्याची फुलपाखरे स्वित्झर्लंड आणि अल्जेरियाच्या गल्ल्या-गल्ल्यातून उडतांना पाहून डोळ्याचे पारणे फिटते.
यौवन आणि स्त्रीसौंदर्याचे चवचाल चोचले पुरविण्यात बँकॉक आणि मनिलो मधील बाजारपेठेत रंगेल पुरुषांचे आत्मे थंड होत असावेत.
भारतीय संस्कृतीचे निनाद मौरिशस आणि सुरिनाम मधील देवळांमधून ऐकतांना आपोआपच डोळे बंद व हात नतमस्तक होतात. भारतापासून शेकडो मैल लांब असलेल्या या देशांमधील राम-कृष्ण गुणगान ऐकल्यानंतर कोण भारतीय नास्तिकता विसरून - क्षणभर का होईना - विसरणार नाही?
मद्या सारखी डोळ्याची लाली आणि प्राचीन कला-संस्कृतीच्या भिन्न अभिरुची पॅरिसमधील आयफेल टॉवर आणि रोममधील प्राचीन अवशेष एवढेच प्रेक्षणीय आहेत.
उद्योग-धंदे आणि धर्म या परस्पर विरोधी गोष्टींचा समन्वय साधून जपान व दक्षिण कोरिया या देशांनी मणी-कांचन योग साधला आहे.
प्रजातंत्र आणि खऱ्या अर्थाने लोकराज्याचा गरुड-ध्वज ऑस्ट्रेलिया आणि ब्रिटनमध्ये मोठ्या दिमाखाने फडकतांना पाहून बौद्धिक मनाला किती समाधान मिळते, याचे वर्णन काय करावे?
बुडापेस्ट आणि सोफियाच्या बाजारात गहू आणि गुलाब सारख्याच चिकित्सेने खरेदी करणारे ग्राहक पाहिले म्हणजे जीवनाचा अर्थ समजतो.
इंडोनेशिया आणि बर्मामध्ये भटकतांना 'आपण कुठेतरी भारतीय संस्कृतीत तर वावरत नाही ना', असा भास झाल्याशिवाय राहत नाही. लंडनमधील संध्याकाळ, पॅरिसमधील मदमस्त रात्री आणि न्यूयॉर्कमधील गडबडीत सुरु होणारी सकाळ, हे सारे क्षण पाहणे ताजमहाल व अजिंठा लेणी पाहण्याइतकेच विलोभनीय आहे, यात शंका नाही.

बाळकृष्ण पाडळकर
ट्रॉय, मिशिगन

Space for Dazzle Printing Ad

GLOBAL SUPPLIER OF COATINGS FOR PLASTICS AND METALS

Dhake Industries offers a wide range of products for Interior and Exterior Automotive Applications as well as other Non-Automotive Applications. Our products are custom formulated to meet the most stringent requirements of any market

- Known in the Industry for Unsurpassed Technical Capabilities
- Leader in Metallic Paint Development for Auto Interiors
- Rapid Product Development with Custom Formulations to Meet Market and Customer Specific Requirements

Various Paint Technologies

- 2K Monocoat
- 2K Base/Clear
- 1K Waterbase
- 2K Waterbase
- One-Coat over TPO/PP
- Adhesion Promoters
- Laser-Etchable Coatings
- Soft-Touch Coatings
- Chrome-Look Coatings
- In-Mold Coatings
- Hydrographics Clearcoats
- Metallic Coating Finishes
- Non-Metallic Coating Finishes
- Much Much More...

Dhake Industries

Please contact us for more information ▸▸▸

Global Headquarters
15169 Northville Rd.
Plymouth, MI 48170
734-420-0101
www.dhakeindustries.com

महाराष्ट्र मंडळ डेट्रॉईट

एकमेका सहाय्य करु, अवघे धरु सुपंथ

“आपले मंडळ”

Maharashtra Mandal of Detroit